महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

अतितात्काळ/कालमर्यादा

क्र. DGP-D१६०२९/२/२०२३-DESK १६ मुंबई, दिनांक:- ३१ /०५/२०२४

**विषय:- राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषद-५५ वी सभा**

***

५५ वी राज्य स्तरीय कर्मचारी वृंद परिषद सभा बुधवार, दि.२२/०५/२०२४ रोजी दु. ११.३० वाजता मा. पोलीस महासंचालक म.राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई येथे घेण्यात आली.

२. सदर सभेमध्ये मागील ५४ व्या सभेतील ११ मुद्यांवर, ५५ व्या सभेतील नवीन २२ मुद्दे व आयत्यावेळी सभासदांनी उपस्थित केलेले नविन ३० मुद्दे तसेच मा. अध्यक्ष महोदयांनी वेळेवर उपस्थित केलेला ०१ मुद्दा असे एकूण ६४ मुद्यांवर चर्चा करण्यात आली आहे. त्याबाबतचा कार्यवृत्तांत माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी यासोबत पाठविण्यात येत आहे. त्यामध्ये अध्यक्षांनी दिलेल्या निर्देशानुसार सर्व संबंधितांनी आवश्यक ती कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सत्वर सादर करावा.

३. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, सदर कार्यवृत्तांत सर्व पोलीस अधिकारी/अंमलदारांच्या निदर्शसनास आणण्यासाठी मुख्यालयाच्या व पोलीस ठाण्यांच्या सूचना फलकांवर लावण्यात याव्यात. त्याचबरोबर ह्या सभेमध्ये घेण्यात आलेले निर्णय घटकांच्या पोलीस राजपत्रांमध्ये प्रसिध्द करावेत. तसेच ह्या कार्यवृत्तांच्या प्रती त्यांच्या आस्थापनेवरील सदस्यांना देवून, त्याबात त्यांचे काही म्हणणे असल्यास, ते एक महिन्याच्या आंत या कार्यालयास कळविण्याविषयी सूचना देण्यात याव्यात व मुदतीत त्यांचे म्हणणे या कार्यालयास प्राप्त झाले नाही, तर सदर कार्यवृत्तांत त्यांना मान्य असल्याचे गृहित धरले जाईल, असेही कृपया त्यांना सूचित करावे.

**( मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मान्यतेने )**

| Office of the Commissioner of Police Greater Mumbai. 5477 | |
|---|---|
| I.W./O.W./D.O./VIP No.. Dtd.: 31/5/2024 | |
| C.P. | |
| Jt C.P. | |
| Addl. C.P/DCP | |

Signed by
Arti Singh
Date: 31-05-2024 13:31:54

**(डॉ. आरती सिंह)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, म. राज्य, मुंबई यांचेकरीता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म. राज्य, मुंबई (सस्नेह)
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह व बृहन्मुंबई वगळून)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2



अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक, कायदा व सुव्यवस्था/ विशेष कृती /आस्थापना/ नि व स/ रा.रा.पो.बल / दहशतवाद विरोधी पथक/वाहतुक/प्रशिक्षण व खास पथके/फोर्स वन/ महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग / नागरी हक्क संरक्षण /आर्थिक गुन्हे शाखा, म.राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक तथा संचालक, दळवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक/महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स वन/ /महिला अत्याचार प्रतिबंधक/सायबर गुन्हे/सागरी सुरक्षा /विशेष सुरक्षा विभाग, दादर, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग,महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान,नागपूर/राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर/अमरावती/नांदेड.
पोलीस उपआयुक्त, सशस्त्र पोलीस प्रशिक्षण , क्रिडा व कल्याण , कलिना, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई.
सर्व पोलीस अधीक्षक(लोहमार्ग/मोटार परिहन विभाग / दळवळण व परिवहन /विशेष कृती/नागपूरसह)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रकटीकरण केंद्र, नाशिक.
पोलीस अधीक्षक, शस्त्र निरीक्षण शाखा, पुणे.

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता-**

सर्व संबंधित कार्यासन अधिकारी, पोमसं कार्यालय, म.राज्य, मुंबई

२/- यांनी कार्यवृत्तांमधील त्यांच्या कार्यासनाशी संबंधित ज्या मुद्यांवर कार्यवाही करणे आवश्यक आहे ती कार्यवाही संबंधित वरिष्ठ अधिका-यांच्या मान्यतेने विनाविलंब करावी व पूर्तता अहवाल त्वरीत **दि.३० जून** पर्यंत न चुकता कार्यासन क्रमांक १६ यांचेकडे पाठवावे.

**<u>प्रत माहितीसाठी:-</u>**

सहायक पोलीस महानिरीक्षक सरसंपादक, दक्षता/ नि व स/ कायदा व सुव्यस्था व विशेष कृती, म.राज्य, मुंबई
पोलीस महासंचालक यांचे सर्व उपसहायक
पोलीस महासंचालक यांचे विधी सल्लागार/विधी अधिकारी
पोलीस उपअधीक्षक, संगणक शाखा, पोमसं, कार्यालय, मुंबई.

प्रत,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सहायक
अपर पोलीस महासंचालक(प्रशासन), म.राज्य, मुंबई यांचे स्वीय सहायक

Examined discuss.

Jt. CP (Admin) Office
Jt. CP (Admin) Dy
04 JUN 2024
Forward to DCP HQ II
Gen No. 3095

DCP HQ II
Forward to A.O. DESK - II
Gen/RB/OR No. 2379 /Dt. 13/06/2024

**५५ वी राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेची सभा बुधवार, दि.२२/०५/२०२४ रोजी दु. १२.३० वाजता महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई येथे घेण्यात आली. सदर सभेमध्ये खालील पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच मंत्रालयीन अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते:-**

| अ. क्र. | नाव व पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १ | श्रीमती रश्मि शुक्ला, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई | पदसिध्द अध्यक्ष |
| २ | डॉ. निखिल गुप्ता, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई | पदसिध्द उपाध्यक्ष |
| ३ | श्री. प्रविण साळुंके, अपर पोलीस महासंचालक, (नि.व सं.) महाराष्ट्र राज्य, मुंबई | पदसिध्द सदस्य |
| ४ | श्री. संजीव कुमार सिंघल, अपर पोलीस महासंचालक (आस्थापना), महाराष्ट्र राज्य, मुंबई | - |
| ५ | श्री. संजय सक्सेना, अपर पोलीस महासंचालक (का.व सु.) म.राज्य, मुंबई | - |
| ६ | श्री. चिरंजिव प्रसाद, अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, म. राज्य, मुंबई | - |
| ७ | डॉ. आरती सिंह, विशेष पोलीस महानिरीक्षक(आस्थापना), म.राज्य, म. राज्य, मुंबई | पदसिध्द सचिव |
| ८ | श्री. मल्लीकार्जुन प्रसन्ना, विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), म.राज्य, मुंबई | - |
| ९ | श्री अभिजीत शिवथरे, सहा.पोलीस महानिरीक्षक (का.व.सु.) ,म.राज्य, मुंबई | सभासद |
| १० | श्री. अतुल सबनिस, पोलीस उपअधीक्षक, सातारा | सभासद |
| ११ | श्री. सुधाकर यादव, पोलीस उपविभागीय अधिकारी, चंद्रपूर | सभासद |
| १२ | श्री. सलिम अमर चाऊस, पोलीस निरीक्षक, हिंगोली | सभासद |
| १३ | श्री. शशिराज पाटोळे, पोलीस निरीक्षक, विपोमनि, कोल्हापूर परि. | सभासद |
| १४ | श्री. विनोद भुरले, पोलीस उपनिरीक्षक, चंद्रपूर | सभासद |
| १५ | श्री. दत्तात्रय चंद्रकांत पवार, पोलीस उपनिरीक्षक, विपोमनि, पुणे परि. | सभासद |
| १६ | श्री. विक्रांत संकपाळ, पोलीस उपनिरीक्षक, प्राचार्य, पो.प्र.कें., तुरची-सांगली | सभासद |
| १७ | श्री. नईम खान मौनोद्दीन खान, सहा. पोलीस उपनिरीक्षक, नांदेड | सभासद |
| १८ | श्री. पंकज पांडे, पोलीस हवालदार, गोंदिया | सभासद |
| १९ | श्री. गजानन घनश्याम डुरे, पोलीस हवालदार, हिंगोली | सभासद |
| २० | श्री. सचिन पवार, पोलीस हवालदार, पुणे ग्रामीण | सभासद |
| २१ | श्री. प्रमोद काळसेकर, पोलीस हवालदार, सिंधुदुर्ग | सभासद |
| २२ | श्री. सचिन बाबुराव पवार, पोलीस हवालदार, समादेशक, रारापोबल, गट क्र.२, पुणे | सभासद |
| २३ | श्रीमती मिना पातोडे, म. पोलीस हवालदार | सभासद |
| २४ | श्री.रविंद्र लोणकर, पोलीस नाईक, विपोमनि, मोटार परिवहन, पुणे | सभासद |
| २५ | श्री. राजेश रमेश भागवत, पोलीस नाईक, विपोमनि, मोटार परिवहन, पुणे | सभासद |
| २६ | श्रीमती मयुरी नंदागवळी, पोलीस शिपाई, भंडारा | सभासद |
| २७ | श्री. संतोष वाघ, पोलीस शिपाई, वाशिम | सभासद |
| २८ | श्री. गणेश शिंदे, पोलीस शिपाई, धाराशीव | सभासद |
| २९ | श्री. डी.बी. केंद्रे पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे | सभासद |
| ३० | श्री. गणेश गोविंद पाटील, सपोशि, समादेशक, रारापोबल, गट क्र.११, नवी मुंबई | सभासद |
| ३१ | श्री. प्रविण शिखरे, पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.) म.राज्य, मुंबई | - |
| ३२ | श्री. श्रीशैल चंद्रप्पा इमडे पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (आस्था-II), म.राज्य, मुंबई | - |
| ३३ | श्रीमती कल्पना लोखंडे, पोलीस महासंचालक यांचे उपसहायक(नि.वे.), म.राज्य, मुंबई | - |
| ३४ | श्री. विनय राणे, पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (गोपनीय ), म.राज्य, मुंबई | - |
| ३५ | पोमसं कार्यालयातील इतर अधिकारी/लिपक वर्गीय कर्मचारी | - |

## सदर बैठकीचे कार्यवृत्तांत खालीलप्रमाणे आहे:-

५५ व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या सभेसाठी सर्व उपस्थितांचे मा. अध्यक्ष महोदया यांच्या वतीने पदसिध्द सचिव तथा विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी स्वागत केले. मा. अध्यक्ष यांना ५५ व्या सभेकरीता सुरवात करण्याची अनुमती घेवून सभेकरीता उपस्थित करण्यात आलेले मुद्दे वाचण्याकामी डॉ. आरती सिंह, विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) यांना सांगितले. त्यानंतर त्यांनी ५४ व्या सभेतील प्रलंबित मुद्दे व ५५ व्या वृंद परिषद बैठकीमध्ये चर्चेकरीता उपस्थित करण्यात आलेल्या नवीन मुद्यांवर चर्चा सुरु केली.

सदर सभेमध्ये राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या ५४ व्या सभेमधील ११ मुद्दे, ५५ व्या सभेतील नवीन २२ मुद्दे व सभासदांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले नविन ३० मुद्दे तसेच मा. अध्यक्ष महोदयांनी वेळेवर उपस्थित केलेला ०१ मुद्या असे एकूण ६४ मुद्यांवर चर्चा करण्यात आली. सदर मुद्यापैकी १२ मुद्दे निकाली काढण्यात आले असून उर्वरित ५२ मुद्यांवर कार्यवाहीचे निर्देश दिले.

मा. अध्यक्षांनी असे निर्देश दिले की, कार्यासन अधिकारी यांनी त्याचेशी संबंधित मुद्यांची पूर्तता करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती कार्यासन क्रमांक १६ कडे द्यावेत. त्यानंतर मा. अध्यक्षांनी सर्वांना धन्यवाद दिले व मा. अध्यक्षांच्या वतीने पदसिध्द सचिव तथा विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी ५५ वी राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषद सभा संपन्न झाली, असे जाहीर केले.

***

आ. क्र. : ०3......./कक्ष-२ (रवका)
दिनांक : १८-०६-२०२४
टेबल क्र. :
श्री./श्रीमती : झांबाडे
प्र.लि. :
का.अ. : [illegible]
व.प्र.अ. : १८/६/२४

(१९)

# कार्यवृत्तांत

## राज्य स्तरीय कर्मचारी वृंद परिषद-५५ वी सभा

## बुधवार, दिनांक :- २२ मे, २०२४

## ५४ व्या राज्य स्तरीय कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीमध्ये सभासदांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे

| अ.क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/ निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोउपनि/पी.पी. खडपकर, एफ कंपनी नायक, समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२, पुणे | **मुद्दा क्र.२** राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२, पुणे येथे आधुनिक पध्दतीने तंत्राज्ञानाने विकसित शाळा व्हाव्यात व सदरच्या शाळा चांगल्या संस्थेकडे चालवावयास द्याव्यात. बाहेरच्या शाळेत फि जास्त असते व लांबचा प्रवास करावा लागतो. | बरेचशे राज्य राखीव पोलीस बल हे बहूतेक शहराच्या ठिकाणी आहेत त्यामुळे तेथे शाळेची कमतरता नाही. ही अडचण सर्वच गटाची नाही, फक्त काही गटाची आहे. **अपर पोलीस महासंचालक, रारापोबल, म.राज्य, मुंबई.** | **कार्यासन क्रमांक-२८-अे** याबाबतचा प्रस्ताव समादेशक, रारापोबल, गट क्र.१, पुणे यांचेकडून अपोमसं, रारापोबल, मंबई यांच्या मार्फतीने प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्ताव हा मोघम स्वरुपाचा व अपुर्ण असल्याने सुधारीत प्रस्ताव वरिष्ठांच्या शिफारशीसह मार्फतीने पाठविण्यबाबत या कार्यालयाचे दि. २१/०५/२०२४ च्या ज्ञापनान्वये गट क्र.१ पुणे यांना कळविण्यात आले आहे. | परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यावर शासनास सादर करण्यात यावा. |
| २ | श्री. संतोष एम. कविटकर, पोहवा/१२७५ सायबर, पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण | **मुद्दा क्र.३** पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचा निवृत्तीपुर्वी मृत्यू झाल्यास त्यांच्या पाल्यांना अनुकंपा तत्वावर नोकरीकरिता प्रतिक्षाधिन यादीत नाव समाविष्ठ करण्यात येते. परंतु नोकरी मिळणेकरिता विलंब लागतो. ज्या पाल्याचे नांव नोंदविले जाते त्याला इतरत्र नोकरी | याबाबत अनुकंपा तत्वावरील वारसाचे नाव काही कारणास्तव बदल्याची एक वेळ संधी देण्याबाबत कार्यासन क्र. ६ ने सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करावा. **कार्यासन क्रमांक-६** | **कार्यासन क्रमांक-६-** कार्यालयीन क्र. DGP-D६०३८/६/२०२३-DESK६, दि.१९/१२/२०२३ अन्वये, शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. | अद्याप शासन निर्णय झालेले नाही. याबाबत शासन निर्णय प्राप्त झाल्यावर सर्व घटक कार्यालयांना निर्गमित करण्यात येईल. |

| अ.क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/ निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | मिळाल्यास अनुकंपा यादीवरील नाव कमी करण्यात येते. पण २ अपत्य असणा-या अधिकारी /कर्मचा-याचे अपत्यास दुस-या मुलास नोकरी देणे जरुरी असल्याने दुस-या मुलाचे नांव नोंदणीस मुभा / तरतुद असावी. | | | |
| ३ | श्री. संतोष एम. कविटकर, पोहवा/१२७५ सायबर, पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण | <u>**मुद्दा क्र.४**</u><br>पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचा मृत्यू झाल्यास त्यांना मिळणा-या शासकीय रकमा पत्नीचे नाव नामनिर्देशित आहे तिलाच मिळतात. परंतु त्याचा आई-वडिलांना कोणताही लाभ होत नाही. | पोलीस दलातील पोलीस अधिकारी / अंमलदार यांच्या मृत्युनंतर मिळणाऱ्या लाभा बाबत टक्केवारी नुसार नामनिर्देशित करण्याबाबत परिपत्रक काढण्याबाबत सर्व घटकांना निर्गमित करावे.<br>**अपर पोलीस महासंचालक, आस्थापना म.राज्य, मुंबई** | <u>**कार्यासन क्रमांक-३९**</u><br>कार्यालयीन परिपत्रक क्र.पोमसं /३९/४२/क.वृं.प/५१ वी सभा/१५१/२०१९, दि.१८/०९/२०२३ अन्वये, सेवानिवृत्त होणा-या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना सेवानिवृत्तीच्या दिवशी निवृत्तीवेतन व इतर लाभ मंजुरीचे प्राधिकार पत्र मजुंरीबाबत परिपत्रक सर्व घटक प्रमुखांना निर्गमित करण्यात आले आहे. | शक्यतो सर्व पोलीस अधिकारी-कर्मचारी यांनी भरती होतांना सुरवातीलाच वारसबाबत सविस्तर फॉर्म भरुन द्यावे, ज्यामध्ये स्पष्ट नोंद करण्यात यावे की, सदर पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्याचा अपघाती मृत्यु झाले तर, आई-वडील यांना किती टक्के आणि पत्नीला किती टक्के लाभ देण्यात यावे ? तसेच याबाबत अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पोलीस बल यांनी याबाबत CISF च्या धर्तीवर वारसांना लाभ देण्याबाबत पुन्हा प्रस्ताव |

| अ.क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/ निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | सादर करावे.<br><br>तसेच याबाबत अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) यांच्याकडुन परिपत्रक काढण्यात यावे की, सर्व पोलीस अधिकारी-कर्मचारी यांनी आपले सेवापुस्तक तपासणी करावी, आणि ज्यांना सेवापुस्तकातील वारसाच्या नोंदीमध्ये बदल करायचे असेल, तर करुन घ्यावे. |
| ४ | श्री. व्ही.व्ही. जिंदे, पोलीस शिपाई पोलीस आयुक्त, सोलापुर शहर | **<u>मुद्दा क्र.५</u>**<br>सुकाणु समितीन्वये पोलीस नाईक हे पद रद्द झालेले आहे. १०-२०-३० चे आश्वासित प्रगती योजनेनुसार त्यांची वेतननिश्चिती होण्यास घटकांमध्ये संदिगधता आहे. | सदरबाबत आपल्या घटकप्रमुखाद्वारे लेखी स्वरुपात अपर पोलीस (आस्थापना) यांच्याकडे सर्व मुद्दे नमुद करुन पाठविण्यात यावे. याबाबत निर्णय घेण्यात येईल.<br>**अपर पोलीस महासंचालक, आस्थापना म.राज्य, मुंबई** | **कार्यासन क्रमांक-६**<br>शासनाने म.शा.गृ.वि. शा.नि.क्र.पीएमएन-०८२१/ प्र.क्र.५३३/ पोल-५ब, दि.२५/०२/२०२२ अन्वये पोलीस नाईक पद रद्द करुन, पोलीस नाईक संवर्गातील पदे पो.शि., पोहवा. व सहा.पोउपनि मध्ये समायोजित करण्यास आणि पोलीस उपनिरीक्षक हे पद पोलीस अंमलदारांच्या साखळीत आणण्यास मान्यता दिली आहे.<br>त्यानुसार सर्व घटकांना त्यांच्या आस्थापनेवरील पो.ना यांची सर्व पदे पोशि, पोहवा व सपोउपनि. पदामध्ये पुर्ण:त समायोजित होईपर्यंत आश्वासित | मे, २०२४ याच महिन्यात सुकाणू समिती आपला अहवाल सादर करेल. |

| अ.क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/ निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रगती योजनेची अंमलबजावणी करण्यामध्ये येत असलेल्या अडचणीच्या अनुषंगाने मार्गदर्शन मिळणेबाबत विविध घटकाने या कार्यालयास प्रस्ताव सादर केला आहे.<br>असे सर्व प्रस्ताव संकलीत करुन, आश्वासित प्रगती योजनेच्या शासन तरतुदी व घटकांना येणा-या अडचणीचा अभ्यास करुन अहवाल सादर करण्याकरीता पोमसं यांचे उपसहायक (आस्था-२) यांचे अध्यक्षतेखाली अभ्यास समिती गठीत केली असून, समितीचा अहवाल प्राप्त होताच, त्यानुसार सर्व घटकांना आवश्यक ते मार्गदर्शन देण्यात येणार आहे. | |
| ५ | पोउपनि/पी.पी. खडपकर, एफ कंपनी नायक, समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२, पुणे | **<u>मुद्दा क्र.६</u>**<br>राज्य राखीव पोलीस बल गटाच्या कंपन्या या बाहेर बंदोबस्त कामी असतात. जर **प्रवास भत्ता** मुळ वेतनाच्या १% किंवा १.५% मिळावा. असा शासन निर्णय झाला तर पोलीस खात्यास वारंवार प्रवास भत्ता वाढवावा ही मागणी करण्याची गरज नाही.<br>**प्रतिवर्ष** मुळ वेतनानुसार प्रवास भत्यात वाढ व्हावी. | सदरबाबत दि. ०४/०२/२०२२ अन्वये महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलीस अधिकारी/अंमलदार यांना देय असलेल्या प्रवास भत्ता व दैनिक भत्त्याच्या दरात तिप्पटीने वाढ करणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदरबाबत **अपर पोलीस** | **<u>कार्यासन क्रमांक-३०</u>**<br>पोलीस दलातील पोलीस अधीकारी/अंमलदार यांना देय असलेल्या **प्रवास भत्ता व दैनिक भत्त्याच्या** दरात तिप्पटीने वाढ करणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. शासन आदेश अद्याप अप्राप्त आहे. तसेच दि.१६/०६/२०२२ व दि.०८/०४/२०२४ अन्वये शासनास स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे. | याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, अद्याप निर्णय झालेला नाही. शासन निर्णय प्राप्त झाल्यावर सर्व घटकांना निर्गमित करण्यात येईल. |

| अ.क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/ निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | | **महासंचालक (नि. व स.) यांनी पाठपुरावा करावा.** | | |
| ६ | श्री. व्ही.व्ही. जिंदे, पोलीस शिपाई पोलीस आयुक्त, सोलापुर शहर | **<u>मुद्दा क्र.७</u>** पोलीस अधिकारी / कर्मचारी सेवानिवृत्तीच्या दिवशी सर्व रकमा मिळाव्यात. | सदरबाबत उशिर होता कामा नये. सेवानिवृत्तीपूर्वी विहित कालावधीत वेतन पडताळणीच्या सर्व बाबी पूर्ण करणे आवश्यक आहे. याबाबत स्थाई आदेश काढुन सर्व घटकांना निर्गमित करण्यात यावे. | **<u>कार्यासन क्रमांक-३९-</u>** कार्यालयीन परिपत्रक क्र.पोमसं /३९/४२/क.वृं.प/५१ वी सभा/१५१/२०१९, दि.१८/०९/२०२३ अन्वये, सेवानिवृत्त होणा-या शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना सेवानिवृत्तीच्या दिवशी निवृत्तीवेतन व इतर लाभ मंजुरीचे प्राधिकार पत्र मजुंरीबाबत परिपत्रक सर्व घटक प्रमुखांना निर्गमित करण्यात आले आहे. | **सदर मुद्दयाबाबत पुर्तता झाल्याने, मुद्दा निकाली काढण्यात येत आहे.** |
| ७ | श्री. काशिनाथ महादेव गुरव, सपोफौ./९०७, रत्नागिरी | **<u>मुद्दा क्र.१०</u>** घटकात वाचक शाखा अस्तित्वात असते. सदर शाखेत अंमलदार यांची मंजूर पदे नाहीत. तेथे पोलीस ठाण्यांकडून किंवा इतर शाखेंकडून अंमलदार नियुक्त केले जातात. तरी वाचक शाखेत अंमलदारांची मंजूर पदे निर्माण करण्यात यावीत. | विचार करण्यात येईल. | **<u>कार्यासन क्रमांक - २६-ब</u>** या कार्यासनाकडून घटक कार्यालयात नव्याने पदे निर्माण करण्याची कार्यवाही जरी करण्यात येत असली तरी, संबंधित घटक कार्यालयाकडून त्यांचे आस्थापनेवर विविध शाखेकरिता वा पोलीस स्टेशनकरिता (उदा. नियंत्रण कक्ष, वाचक शाखा, विशेष शाखा, पोलीस स्टेशनकरिता इ.) मंजूर संख्याबळापेक्षा अधिक वाढीव मनुष्यबळाची (अधिकारी व कर्मचारी) आवश्यक्ता असल्यास, त्याबाबतचे परिपूर्ण प्रस्ताव त्यांचेकडून या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतरच, सदर प्रस्ताव मंजूरीकरिता शासनास | याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, अद्याप निर्णय झालेला नाही. शासन निर्णय प्राप्त झाल्यावर सर्व घटकांना निर्गमित करण्यात येईल. |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>सभासद व घटकांचे नांव</th><th>उपस्थित केलेला मुद्दा</th><th>मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश</th><th>कार्यासनाचे अभिप्राय</th><th>मा. अध्यक्षांचे आदेश/ निर्देश</th></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td>सादर करण्याबाबतची कार्यवाही या कार्यासनाकडून करण्यात येते.<br>सद्य:स्थितीत खालील घटक प्रमुखांकडून त्यांचे आस्थापनेवर वाढीव मनुष्यबळ मंजूर होण्याबाबत प्राप्त झालेले परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयाचे क्र.पोमसं /२६-ब/कवृंप/५४ वी सभा/४०/२०२३, दि.०१/०६/२०२३, दि.०८/०६/२०२३ व दि.२१/०५/२०२४ अन्वये, शासनास प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत.:-
<table>
<tr><th>क्र.</th><th>घटक कार्यालय</th><th>वाढीव पदे</th></tr>
<tr><td>१</td><td>पो.आ. पिंपरी-चिंचवड-रावेत पो.स्टे.</td><td>१५७</td></tr>
<tr><td>२</td><td>पोआ पिंपरी चिंचवड-शिरंगाव पो.स्टे.</td><td>१२६</td></tr>
<tr><td>३</td><td>पोआ पिंपरी चिंचवड-महाळुंगे पो.स्टे</td><td>२०३</td></tr>
<tr><td>४</td><td>पोलीस अधीक्षक अहमदनगर</td><td>५००</td></tr>
<tr><td>५</td><td>प्राचार्य,गुन्हे अन्वेषण विद्यालय, नाशिक</td><td>६७</td></tr>
<tr><td>६</td><td>समृध्दी महामार्ग २४ प्रस्तावित मदत केंद्रे</td><td>८६४</td></tr>
<tr><td>७</td><td>कोयनानगर पोलीस प्रशिक्षण केंद्र</td><td>२६४</td></tr>
</table></td><td></td></tr>
<tr><td>८</td><td>श्री. सुरेश परदेशी, पी.सी.आर., नाशिक</td><td><u>मुद्दा क्र.११</u><br>Covid-१९ मध्ये जे अधिकारी/कर्मचारी इस्पितळात दाखल झाले होते. त्यांचेकडून</td><td>संबधित पोलीस अधिकारी /कर्मचारी यांनी अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) यांच्याकडे लेखी</td><td><u>कार्यासन क्रमांक-२८</u><br>पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांचे क्र.पोनि /पो.क/कर्मचारी वृंद परिषद/९९०/२०२३, दि.१९/१२/२०२३</td><td>सदर मुद्दयाबाबत पुर्तता झाल्याने, मुद्दा निकाली काढण्यात येत आहे.</td></tr>
</table>

| अ.क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/ निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | अनामत रक्कम घेण्यात आलेली आहे. ती अद्याप परत मिळालेली नाही. | स्वरुपात माहिती पाठवावी. **कार्यासन क्रमांक-२८** | अन्वये, पोलीस अधीक्षक (ना.ह.सं) नाशिक परिक्षेत्र यांचे आस्थापनेवरील Covid-१९ जे पोलीस अधिकारी/ कर्मचारी इस्पितळात दाखल झाले होते. त्यांचेकडून घेण्यात आलेली अनामत रक्कम हॉस्पीटल यांनी परत केली असल्याचे सदर पत्रान्वये कळविले आहे. | |
| ९ | पोउपनि/पी.पी. खडपकर, एफ कंपनी नायक, समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२, पुणे | **मुद्दा क्र.१३** राज्य राखील पोलीस बल येथे निवासस्थानाची कमतरता आहे. तसेच काही इमारती निष्कासित झाल्या आहेत. तरी नवीन इमारती बांधून मिळणेबाबत. | शासकीयनिवासस्थानाबाबत शासनाचे विविध उपक्रमांतर्गत तसेच पोलीस हौसिंग अंतर्गत नविन निवासस्थान बांधण्याचे शासन स्तरावर प्रयत्न चालू आहेत. पुढील काळात अनुदानाची उपलब्धता झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल. **अपर पोलीस महासंचालक, रारापोबल, म.राज्य, मुंबई** | **अपोमसं, रा.रा.पो.बल, म.राज्य, मुंबई.-** १. समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्र. २, पुणे या गटाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी/अंमलदार व वर्ग -४ कर्मचारी यांचेसाठी शासकीय निवासस्थानांची कमतरता असलेले या कार्यालयाचे पत्र क्र.पशा-प्रलि/गट-२/शासकीय निवासस्थाने/ २०१६/९३४, दि.१५/०७/२०१६ अन्वये, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मया. मुंबई यांचे कार्यालयात गटाच्या मंजूर संख्याबळाच्या ८० टक्के प्रमाणे ११६४ शासकीय निवासस्थाने बांधकामाबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहे. २. अवर सचिव, महाराष्ट्र | अनेक ठिकाणी पोलीस निवासस्थानाची सोय करण्यात आलेली आहे परंतु तेथे पोलीस अधिकारी-कर्मचारी रहायला तयार नाही. निवासस्थाने रिक्त आहेत. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.) यांनी याबाबत पुर्तता करावी. |

| अ.क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/ निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | | | शासन यांचेकडील क्र.बैठक-०९१६/प्र.क्र.६०५/पोल-७, दिनांक १४/०९/२०१६ अन्वये, **८००** सेवा निवासस्थाने प्रस्ताव महामंडळाच्या आगामी बोर्ड मिटींगमध्ये चर्चेस ठेवणेसाठी **व्यवस्थापक संचालक महाराष्ट्र राज्य, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मया. मुंबई** यांना आदेश दिलेले आहेत. त्यानुसार ११६४ निवासी प्रकल्पास व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या.मुंबई यांचेकडील क्र. PHC /TB/EE(KOP) ११७४ qtrs- SRPF Gr.११/१५१०/२०१८ Date. १४.०५.२०१८ अन्वये, **प्रशासकीय** मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर निवास बांधकामाचा मास्टर प्लॅन तयार करण्यात आलेला आहे.<br>३. समादेशक गट क्र. २ पुणे कार्यालयाच्या आस्थापनेवर आपले कार्यालयाकडील आस्थापनेवर आपले पत्र क्र. पोमसं/२७ बी/२८ बी-२/२७५-निवास. बांधणे गट क्र. २ पुणे/३५३/२०१३, दि.०३/०४/२०१९ अन्वये, मंजुरी मिळालेप्रमाणे टाईप-बी **२००** शासकीय निवासस्थाने प्रथम प्राधान्याने बांधणेसाठी निधी उपलब्ध | |

| अ.क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/ निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | | | होणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे. | |
| १० | पोउपनि/पी.पी. खडपकर, एफ कंपनी नायक, समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२, पुणे | **मुद्दा क्र.१४** राज्य राखीव पोलीस बल येथे सहाय्यक पोलीस आयुक्त यांची **७३** पदे रिक्त आहेत. सदरची पदे भरल्यास मागील अधिका-यांना पदोन्नतीचा लाभ लवकर मिळेल तसेच इतर अधिका-यांवर येणारा अधिक कामाचा ताण कमी होईल. | सदरबाबत अपर पोलीस महासंचालक, रा.रा. पो. बल, मुंबई यांनी एक आठवडयाच्या आत सविस्तर प्रस्ताव पाठविणे. सदर प्रस्ताव **कार्यासन क्र. २** कडुन शासनास पाठविण्यात येईल. | **कार्यासन क्रमांक-२** राज्य राखीव पोलीस बल संवर्गात सहायक समादेशक या संवर्गाची एकूण १०० पदे मंजूर असून त्यापैकी ३०% पदे ही सरळ सेवेने म्हणजे ३० पदे व ७०% पदे पदोन्नतीने म्हणजे ७० पदे भरली जातात. सदर ३०% पदे म्हणजे ३० पदे ही सेवा प्रवेश नियमांच्या तरतुदीनुसार लष्करातील सेवानिवृत्त अधिकारी यांच्यातुन भरण्याची तरतुद आहे. अद्यापपर्यंत सदर सरळ सेवेने पदे भरण्यात आलेली नसल्याने ३०% पदे रिक्त आहे. तसेच पदोन्नतीने भरावयाची ७०% पदे म्हणजे ७० पदापैकी ६६ पदे भरण्यात आलेली असुन सद्यस्थितीत फक्त ०४ पदे रिक्त आहेत. | सदर मुद्दयाबाबत पुर्तता झाल्याने, **मुद्दा निकाली काढण्यात येत आहे.** |
| ११ | श्री. एम.के. भंडारे, पोहवा, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे | **मुद्दा क्र.१७** अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आस्थापनेवर पो.शि. / पो.हवा (एटप) ही पदे मंजूर आहेत. **सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक** हे पद मंजूर करण्यात यावे. | अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषन विभाग, पुणे यांचेकडुन सविस्तर मुद्देनिहाय माहिती मागवुन शासनास प्रस्ताव सादर करणे. | **कार्यासन क्रमांक-२६-ब** अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयातील मंजूर पदांचा सुधारित आकृतीबंधास गृह विभाग, शासन निर्णय, क्र. एपीओ-११२२/प्र.क्र.११६/पोल-३, | **सदर मुद्दयाबाबत पुर्तता झाल्याने, मुद्दा निकाली काढण्यात येत आहे.** |

| अ.क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/ निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | | | दि.११/०८/२०२३ अन्वये शासनाने मान्यता दिली असुन, आकृतीबंधानुसार अ.पो.मसं, गु.अ.वि, म.राज्य, पुणे यांचे आस्थापनेवरील पोलीस नाईक संवर्गातील पदे अनुक्रमे पोलीस शिपाई, पोलीस हवालदार या संवर्गामध्ये वर्ग करण्यात आले असून, अपोमसं, गु.अ.वि, म.राज्य, पुणे यांचे आस्थापनेवर नव्याने **०२ सहा. पोलीस उपनिरीक्षक (ASI) पदे मंजूर करण्यात आले आहेत.**<br>**त्यामुळे सदर मुद्याचे निरसन करण्यात आले आहे.** | |

****

# राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषद ५५ वी सभा (नवीन मुद्दे)

| अ.क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|---|
| १ | पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण | **अपघात व आजाराने अपंगत्व आलेल्या पोलीस अंमलदारांना , इच्छेनुसार स्वेच्छा निवृत्ती देवून त्यांचे एका अपत्याला पोलीस विभागामध्ये नोकरी देण्याबाबत-** अमरावती जिल्हा ग्रामीण पोलीस घटकामध्ये बरेच पोलीस अंमलदार आजाराने ग्रस्त असुन काही पोलीस अमंलदारांना पॅरालीसीस, अपघात झाल्याने शारीरीक अवयव ट्रान्सप्लँट केल्याने अपंगत्व आलेले आहे. तसेच अजाराने ग्रस्त असलेले अंमलदार हे कर्तव्य करण्यास सक्षम नसतांना बरेच पोलीस अंमलदार सेवानिवृत्तीच्या उंबरवठयावर आहे अशा पोलीस अंलदारांना आलेल्या आजाराने आणि अपंगत्वामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास बंदोबस्ताकरीता उपयोगी पडू शकत नाहीत. त्यामुळे अशा पोलीस अंलदारांना त्यांचे इच्छेनुसार विनंती करुन स्वेच्छानिवृत्ती देण्यात येवून विनंतीवरुन त्यांचे एका अपत्याला पोलीस विभागामध्ये योग्यतेप्रमाणे नोकरी देण्यात यावी. | **कार्यासन क्रमांक-१०** पोलीस विभागातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकीय मंडळाने प्रमाणित केल्यानुसार नोकरी करण्यास कायमचे असमर्थ ठरवून रुग्णता निवृत्त झाल्यास संबधित पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटुंबियांपैकी पात्र वारसदारांस शैक्षणिक अर्हता व पात्रतेनुसार एक विशेष बाब म्हणून अनुकंपा तत्वावर गट-क व गट-ड पदावर नोकरी देणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/१०/अकंपा-रुग्णता निवृत्ती /७४/२०२१, **दि.२७/१२/२०२१** अन्वये शासनास सादर करण्यात आलेले आहे. याबाबतचे शासन आदेश अद्याप कार्यालयास प्राप्त झालेले नाहीत. तसेच, कार्यालयीन दि.२३/०२/२०२२, दि.०७/०६/२०२२, दि.०३/०५/२०२३ व दि.२१/०५/२०२४ अन्वये शासनास स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे. | याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे, अद्याप शासन निर्णय झालेला नाही. शासन निर्णय प्राप्त झाल्यावर सर्व घटकांना निर्गमित करण्यात येईल. |
| २ | पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण | **आंतरजिल्हा बदली प्रस्तावामध्ये अपघातग्रस्त अंमलदारांना प्रथम प्राधान्य मिळणेबाबत.-** महाराष्ट्र राज्यातील पोलीस अंमलदार हे नोकरीनिमित्त इतर जिल्हयामध्ये नेमणूकीस असतनांना बरेच अंमलदार अपघातग्रस्त झाल्याने त्यांचे शारीरीक अवयव निकामी | **कार्यासन क्रमांक-६** शासनाने गृह विभाग शा.नि. क्र.संकिर्ण-१०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५ब, दि.२६/१०/२०१७ अन्वये राज्य पोलीस विभागातील पो.शि. ते सपोउपनि यांच्या आंतर जिल्हा बदली संबंधातील नियमावलीस मान्यता दिली आहे. | अपर पोलीस महासंचालक (आस्थापना) यांनी याबाबत आवश्यक अभ्यास करुन कार्यवाही करावी. |

| अ.क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | होतात. त्यामुळे असे पोलीस अंमलदार आंतरजिल्हा बदलीकरीता जिल्हा पोलीस घटक प्रमुख कार्यालयाकडे विनंती अर्ज सादर करतात परंतु आंतरजिल्हा बदलीबाबत जिल्हा घटक कार्यालयाकमध्ये बराच विलंब होतो.<br>त्यामुळे अपघातग्रस्त पोलीस अंमलदार यांना त्यांचे विनंतीवरुन मागणीप्रमाणे त्यांचे जिल्हयामध्ये आंतरजिल्हा बदलीबाबत प्रथम प्राधान्य मिळणेकरीता बदली अर्ज, प्रस्ताव/स्विकृतीबाबत राज्य घटक प्रमुख कार्यालयाकडून सर्व जिल्हा घटक प्रमुखांना पत्रव्यवहार करण्यात यावे. | त्यातील नियम क्र.२(II) अन्वये मुळ घटकात किमान **८ वर्ष** सेवा पूर्ण असणा-या व खालील अपवादात्मक परिस्थितीत बदलीस पात्र राहतील, अशी तरतुद आहे:-<br>१. पती-पत्नी एकत्रिकरण प्रकरणी (पती किंवा पत्नी शासकीय अथवा निमशासकीय सेवेत असल्यासच लागू होईल)<br>२. कर्मचा-याचा स्वत:चा, पत्नीचा, आईचा, वडिलांचा अथवा मुलाचा गंभीर वैद्यकीय आजार (सक्षम अधिकारी गरज वाटल्यास शल्य चिकित्सक कडून अहवाल प्राप्त करुन घेतील.)<br>३. नक्षलवादी/अतिरेकी हल्ल्यातील पीडीत कुटुंबातील पोलीस कर्मचारी.<br>सदर मुद्याचे अवलोकन करता, अपघातग्रस्त पोलीस अंमलदाराची त्यांच्या विनंती नुसार बदली करावयाची झाल्यास, वरील तरतुदीमध्ये समावेश करण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.मान्य झाल्यास प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल. | |
| ३ | सपोह/३५७ जे आर ईखे, नेम. राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१४, छत्रपती संभाजीनगर | महाराष्ट्र राज्य शासन गृह विभाग शा.नि. कं.सकिर्ण २०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोल ५-ब, दि.२६/१०/२००७ मधील मुद्दा क्र.५ मध्ये नमूद प्रमाणे राज्य राखीव पोलीस विभागातील पोलीस शिपाई ते सहा.पोउपनि दर्जापर्यंतच्या पोलीस अंमलदार यांना घटक अंतर्गत बदलीनंतर सेवाज्येष्ठता ही बदली झालेल्या घटकामध्ये त्यांच्या भरती वर्षाच्या सेवाजेष्ठतेत सर्वात कनिष्ठ असलेल्या | <u>**कार्यासन क्रमांक-६**</u><br>गृह विभाग शा.नि. क्र. संकिर्ण १०१७ /३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५ब, दि.२६/१०/२०१७ सोबतच्या नियमावलीतील नियम क्र.५ (सेवाज्येष्ठता) आणि शासन परिपत्रक क्र.पीएमएए०३१४/२०३/प्र.क्र.६८/पोल-५ब, दि.१२.०५.२०२१ मधील परि.क्र.३ मध्ये राज्य पोलीस विभागातील पोशि ते सपोउपनि दर्जापर्यंतच्या पोलीस कर्मचा-यांच्या घटक बदलीनंतर, बदलेल्या | गृह विभाग शा.नि. क्र. संकिर्ण १०१७ /३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५ब, दि.२६/१०/२०१७ च्या शासन निर्णय नुसार कार्यवाही करण्यात येईल. |

| अ.क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | शेवटच्या पोलीस शिपाई यांचे खाली निश्चीत होईल असे नमूद करण्यात आले आहे. परंतु राज्य राखीव पोलीस दलातील अंमलदार जेव्हा इतर घटकामध्ये बदली होते. त्यावेळी त्यांना बदली झालेल्या पोलीस अंमलदार ज्या दिनांकाच्या वर्षी ते भरती झालेला आहे. त्या पदावर पदोन्नती करीता पात्र ठरविण्यात येत नाही. काही घटकामध्ये बदलीच्या ठिकाणी १ दिवसांच्या फरकाने पदोन्नती लगेच दिली जाते. परंतु इतर घटकामध्ये ३ वर्षाचा कालावधी झाल्याशिवाय त्यांना पदोन्नती पदोन्नती दिली जात नाही किंवा मानिव दिनांक मंजुर केला जात नाही. त्यामुळे बदली झालेल्या पोलीस अंमलदारांना मानसीक व आर्थिक नुकसानास सामोरे जावे लागत आहे. तरी अशी विनंती आहे की, बदली झाल्यानंतर ज्या घटकामध्ये बदली झालेली आहे. त्या ठिकाणी ज्या बॅचची पदोन्नती सुरु आहे. त्यांचे खाली नमूद पोलीस अंमलदार यांना मानिव दिनांक देवून पदोन्नती देण्यास यावी हि विनंती आहे. (महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.दि.०६/०६/२००२ मध्ये तपासणीचे मुद्दे देण्यात आलेले आहेत परंतु त्यामध्ये बदली नंतर सेवाज्येष्ठतेबाबत काही बाबी स्पष्ट नमुद नाहीत:) | घटकात कर्मचा-याची सेवाज्येष्ठता त्यांची महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई पदावरील भरती दिनांक ग्राहय धरुन त्यां दिनांकाच्या वर्षी घटक बदली झालेल्या घटकात पोशि या पदावर भरती झालेल्या व त्यावर्षी सेवाज्येवष्ठता सर्वात कनिष्ठ असलेल्या पोलीस शिपाई यांचे खाली निश्चित होईल.तसेच ज्या कर्मचा-यांचे एकापेक्षा अधिक वेळी घटक बदली करण्यात आली आलेली आहे. अशा पोलीस अंमलदारांची सेवाज्येष्ठतादेखील याचा निकाषानुसार निश्चित हाईल. अशी तरतुद आहे.<br>सदर शासन निर्णयातील तरतुदी या स्पष्ट असल्याने, सदर नियमांचे तंतोतंत पालन होत नसल्याचे या कार्यालयाचे निर्देशनास आलयाने या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/६/पो.अ./आं.जि.ब-से.ज्ये./१९७/२०२३, दि.१८/०८/२०२३ अन्वये सर्व घटकांना सविस्तर निर्देश देण्यात आलेले आहे.<br>मान्य झाल्यास सर्व पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षक यांना त्यांच्या घटकामध्ये अन्य घटकातून/रारापोबलातून अंमलदार आंतरजिल्हा बदलीने बदलूनच येताच त्यांची सदर शासन तरतुदीनुसार सेवाज्येष्ठता तातडीने निश्चित करुन त्यानुसार त्यांची वेतननिश्चिती करण्याबाबत पुन: निर्देश देण्यात येईल. | |

१९

| अ.क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|---|
| ४ | सपोह/३५७ जे आर ईखे, नेम. राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१४, छत्रपती संभाजीनगर | राज्य राखीव पोलीस बलातील कंपन्यांना महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेसाठी विविध बंदोबस्ताकरीता महाराष्ट्रात तात्काळ व कमी कालावधीत पाठविण्यात येते परंतु महाराष्ट्रामध्ये ज्या ठिकाणी उदा. कोल्हापूर येथे राज्य राखीव पोलीस बलाचा ग्रुप असतांना त्यांना महाराष्ट्रात इतर ठिकाणी बंदोबस्तास पाठविले जाते व इतर ठिकाणच्या राज्य राखीव पोलीस बलाच्या कंपन्या कोल्हापूर येथे बंदोबस्तास पाठविण्यात येते त्यामुळे बंदोबस्तास पोहचण्यासाठी वेळ लागतो. **त्याअनुषंगाने जर ज्या जिल्हामध्ये बंदोबस्त असेल त्या ठिकाणी जवळ असलेल्या राज्य राखीव पोलीस बलाच्या कंपन्या पाठविण्यात याव्यात ही नम्र विनंती** जेणेकरुन वेळेची व आर्थिक बाबीची बचत होवून बंदोबस्तासाठी तातडीने पोहचता येईल. | **<u>अपोमसं, रारापोबल, म.राज्य, मुंबई-</u>**<br>राज्य राखीव पोलीस बलातील कंपन्यांचे तैनातीचे आदेश प्राप्त झाल्यांनतर राज्य राखीव पोलीस बलाच्या कंपन्या बंदोबस्तास तैनात करतांना खालील बाबींचा विचार करण्यात येत असतो.<br>१. गटातील कंपन्याची उपलब्धता.<br>२. आगामी नक्षल बंदोबस्त/ महत्वाचा बंदोबस्त.<br>३. गट मुख्यलयापासूनचे बंदोबस्त ठिकाणचे अंतर<br>४. गट आस्थापनेवरील मनुष्यबळ व वाहनसंख्या<br>५. बंदोबस्ताचे गांभीर्य.<br>उदा. जर बंदोबस्त आवश्यक केलेल्या गट १६ कोल्हापूर गट आस्थापनेवर उपलब्ध असतील तर निश्चितच कोल्हापूर येथेच तैनात करण्यात येते.<br>परंतु, जर राज्य राखीव पोलीस बल गट १६ कोल्हापूर कडे १ कंपनी उपलब्ध असेल आणि पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग हे अंतर ३६९ किमी असुन पोहोचण्यास ०७ तास अपेक्षित आहेत. गट १६ कोल्हापूर ते सिंधुदुर्ग हे अंतर १२८ किमी असुन पोहचण्यास ०३ तास अपेक्षित आहेत. गट १० सोलापूर ते कोल्हापूर हे अंतर २३० किमी, असुन पोहचण्यास ०४ तास अपेक्षित आहेत. उपरोक्त प्रमाणे अपवादात्मक परिस्थीतीमध्ये दोन्ही गटांची कंपनी बंदोबस्तास अंतर व कालावधी कमी करण्याच्या दृष्टीकोनातून वेळेचा अपव्यय व बंदोबस्त कंपनीचा लांबचा प्रवास टाळणेकरीता गट १६ कोल्हापूर कंपनीस कोल्हापूर ऐवजी सिंधुदुर्ग येथे व गट १० सोलापूर यांचे कंपनीस कोल्हापूर येथे बंदोबस्तास पाठविणे सोयीचे ठरते. | शक्यतो जेथे आहे तेथे अथवा नजीकच्या ठिकाणी पाठविण्याचा आमचा प्रयत्न असतो. यामध्ये शासनाची ख़र्चाबाबत बरीच बचत होते. मात्र गडचिरोलीला प्रत्येक कंपन्यांना जावेच लागेल. |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>सभासद व घटक कार्यालयाचे नाव</th><th>उपस्थित केलेला मुद्दा</th><th>कार्यासनाचे अभिप्राय</th><th>मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश</th></tr>
<tr><td>५</td><td>प्रशांत वासुदेव पाटील ऐएसआय/७७९, नेम.पोस्टे उरळ पोलीस अधीक्षक, अकोला</td><td>अकोला जिल्हयातील पो.स्टे अकोट, चान्नी,बाळापूर,पातूर,उरळ येथील अधिकारी व कर्मचारी निवासस्थानाची पडझड झालेली असून तेथे निवासस्थान नव्याने निर्माण करण्याची गरज आहे. तसेच पोलीस स्टेशन तेल्हारा व दहीहांडा येथे पोलीस स्टेशन करीता नवीन इमारत बांधण्यात आलेली आहे. परंतु ५ ते १० वर्षापासून सदर इमारतीचे काम अद्यापही अपुर्ण आहे. तरी सदर कामकाज प्रथम प्राधान्याने होणेस विनंती आहे.</td><td><u>कार्यासन क्रमांक-२७</u><br>या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं / २७ / ४८ पो.टे. व निवा., २७ सेवा निवा. व ३४ इतर प्रशा.इमारत / प्राधान्यक्रम/१३६/२०२१/२०२३, दि.२०/११/२०२३ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. शासन मान्यता अद्याप अप्राप्त आहे. सदर प्राध्यान्यक्रम यादीमध्ये पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकरीता सेवा निवासस्थान बांधकामाचा खालीलप्रमाणे समावेश केला आहे:-<table><tr><th>अ.क्र.</th><th>पोलीस स्टेशन</th><th>निवासस्थान संख्या</th></tr><tr><td>१</td><td>पोलीस स्टेशन, अकोट शहर</td><td rowspan="4">१९८</td></tr><tr><td>२</td><td>पोलीस स्टेशन, तेल्हारा</td></tr><tr><td>३</td><td>पोलीस स्टेशन, हिवरखेड</td></tr><tr><td>४</td><td>पोलीस स्टेशन, दहिहांडा</td></tr></table>पोलीस स्टेशन, दहिहांडा करीता प्रशासकीय इमारत बांधकामाच्या वाढीव निधीस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत शासनास विनंती करण्यात आली आहे. प्रशासकीय मान्यता अद्याप अप्राप्त आहे.</td><td>काही घटकात बरेच पोलीस निवासस्थान तयार होवून रिकामे पडुन आहेत. कोणीही घेण्यास तयार नाही.जर आपली सहमती असेल, पोलीस मुख्यालयाच्या ठिकाणी निवासस्थान आणि इतर पोलीस स्टेशन सारख्या ठिकाणी छोटया शहरात पोलीस अधिकारी यांचेसाठी सिंगल रुम आणि पोलीस कर्मचारी यांचेसाठी २० पोलीस कर्मचारी साठी सर्व सोईयुक्त बॅरेक रुम तयार करण्यात बाबत पोलीस गृहनिर्माण यांच्याकडे शिफारस करण्यात येईल.</td></tr>
<tr><td>६</td><td>प्रशांत वासुदेव पाटील ऐएसआय/७७९, नेम.पोस्टे उरळ पोलीस अधीक्षक, अकोला</td><td>सातव्या वेतन आयोगातील १०:२०:३० पदोन्नती संदर्भात बरेचशे प्रश्न यापुर्वी कर्मचारी वृंद परिषदेत वेळोवेळी मांडण्यात आलेले आहे. परंतु सदर पदोन्नती बाबत प्रत्येक घटकांची वेगवेगळी भुमीका असल्याचे निदर्शनास येत आहे. सदर बाबतीत वरीष्ठ स्तरावरुन प्रथम प्राधान्याने परीपुर्ण मार्गदर्शन होवून कर्मचारी वर्गात असलेला संभ्रम दुर</td><td><u>कार्यासन क्रमांक ६</u><br>शासनाने म.शा.गृ.वि. शा.नि.क्र.पीएमएन-०८२१/ प्र.क्र.५३३/ पोल-५ब, दि.२५/०२/२०२२ अन्वये पोलीस नाईक पद रद्द करुन, पोलीस नाईक संवर्गातील पदे पो.शि., पोहवा. व सहपोउपनि मध्ये समायोजित करण्यास आणि पोलीस उपनिरीक्षक हे पद पोलीस अंमलदारांच्या साखळीत आणण्यास मान्यता दिली आहे.</td><td>सदर मुद्याबाबत पूर्तता झाल्याने, मुद्दा निकाली काढण्यात येत आहे.</td></tr>
</table>

| अ.क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|---|
